❖ तेलुगु साहित्य अकादमीची उद्दिष्टे :-

- राज्यातील बहुभाषिकांच्या म्हणजेच मराठी भाषिकांच्या संस्कृती, साहित्य, भाषा व लोकजीवनाशी सुसंवाद साधून सांस्कृतिक सुसंवाद निर्माण करण्याची कला या भाषिक अल्पसंख्यांकांना अवगत व्हावी.

- तेलुगु, भाषा, साहित्य, कला व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करणे.

- तेलुगु भाषा, साहित्य आणि कला क्षेत्रातील व्यक्तींना पुरस्कृत करणे.

- तेलुगु भाषेच्या विकास व संवर्धनासाठी प्रोत्साहन देणे.

- तेलुगु भाषेतील वाङ्.मयीन कृती प्रकाशित करण्यास सहाय्य करणे.

- मराठी आणि तेलुगु या भाषांमध्ये साहित्यिक कल्पनांची देवाण-घेवाण करणे.

- तेलुगु भाषिक अल्पसंख्याकांनी केवळ त्यांच्या भाषेतील कार्यक्रम आयोजित करुन मर्यादित सामाजिक सुसंवाद ठेवण्याऐवजी त्यांच्या भाषेतील कार्यक्रमांसोबतच मराठी भाषिक कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यामध्ये मराठी भाषिकांनाही सहभागी करुन सामाजिक सुसंवाद निर्माण करणे.

- तेलुगु भाषेसोबतच मराठी भाषेतही परीसंवाद, चर्चासत्रे, कविसंमेलने यासारखे साहित्यिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

- तेलुगु सोबतच मराठी भाषिकांच्या लोककलांची संमेलने आयोजित करणे.